REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० | पुणें, बुधवार, तारीख १२ एप्रिल, १९४४ | अंक १५

## दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

( स्थापना : १९१९ )

**आम्हीं आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.**

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—

**सर होमी मेहता,** के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
**मोति माणिक मॅन्शन,**
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
**मेहता हाऊस,**
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव
मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार
चौक,
पुणें

## विविध माहिती

### मिडलंड बँकेचे आठ हजार तरुण नोकर सैन्यांत दाखल

ग्रेट ब्रिटनमधील मिडलंड बँकेच्या नोकरांपैकी २०१ नोकर युद्धाच्या आघाडीवर मरण पावले, २९ बेपत्ता आहेत व १०९ युद्धकैदी झाले आहेत. २५ नोकर ग्रेट ब्रिटनवरील बाँब हल्ल्यास बळी पडले. युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतापर्यंत ह्या बँकेच्या नोकरवर्गापैकी ८ हजार तरुण लोक सैन्यांत दाखल झाले आहेत. सध्या बँकेच्या पटावर ११,१०० नोकर आहेत; म्हणजे युद्धापूर्वीच्या मानानें त्यांची संख्या आतां ८५% आहे.

### कलकत्ता शहरांतील लष्करी लॉर्‍यांचे अपघात

कलकत्ता शहरांत १९४३ सालीं मिलिटरी लॉर्‍यांचे १,९८० अपघात झाले, त्यांपैकी १५२ प्राणघातक ठरले. ह्यासंबंधांत १९ खटले भरण्यांत आले. त्यांपैकी ३ खटल्यांतील गुन्हेगारांस शासन मिळालें. शहरांतील लष्करी वहातुकीचा घातकीपणा लष्करी अधिकाऱ्यांच्या नजरेस आणण्याचें काम बंगाल सरकारनें केलें आहे.

### कोळसा सापडला

ग्रेट ब्रिटनमध्यें कोळशाची एक मोठी पट्टी निदर्शनास आली आहे, तिचा त्या देशांतील कोळशाचा पुरवठा टिकण्यास चांगला उपयोग होणार आहे.

### बँक ऑफ इंग्लंडचे नवे गव्हर्नर

बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर, मि. मॉंटेग्यू नॉर्मन, ह्यांनी प्रकृतीचे कारणास्तव आपल्या जागेचा राजीनामा दिला आहे. त्यांचे जागीं लॉर्ड कॅटो ह्यांची नेमणूक झाली आहे. मि. नॉर्मन हे गेलीं २४ वर्षे बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर आहेत. ता. १४ एप्रिल रोजीं ते सेवानिवृत्त होतील.

### चहाचा साठा

मुंबई शहर व उपनगर ह्यांतील १०० पौंडापेक्षा अधिक चहाचा साठा धारण करणारांस दर आठवड्यास आपला साठा सरकारास कळवावा लागत असे. ह्यापुढें तो प्रत्येक महिन्यास कळविण्याचा आहे.

### जंगलाचें क्षेत्र वाढविण्याचा विचार

ब्रिटिश हिंदुस्थानाचें क्षेत्रफळ सुमारें ८ लक्ष चौरस मैल आहे. त्यांपैकीं सुमारें १ लक्ष चौरस मैलांत जंगल आहे. आणखी १ लक्ष चौरस मैलांचें जंगल करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे.

### अमेरिकेचें रशियाला सहाय

चालू वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत अमेरिकेनें रशियाकडे खंड–उसनवार पद्धतीनें १० लक्ष टन युद्धसाहित्य पाठविलें, १९४२ च्या जानेवारी–फेब्रुवारीचा तत्सम आकडा २ लक्ष टन होता. १९४३ च्या जानेवारी–फेब्रुवारींत ६½ लक्ष टन युद्ध साहित्य रशियाकडे गेलें होतें.

### शेतकी कॉलेजांतील विद्यार्थी

पुण्याच्या शेतकी कॉलेजांत येत्या वर्षापासून १०० ऐवजीं १५० विद्यार्थ्यांस प्रवेश मिळूं शकेल.

### नवीन लशीचा शोध

रशियांतील शास्त्रज्ञांनीं इन्फ्लुएन्झा प्रतिबंधक लस शोधून काढली आहे.

### मुंबई येथील कामगारांच्या रहाणीच्या खर्चाचे मान

जून १९३४ अखेरच्या वर्षांतील रहाणीच्या खर्चाचा आकडा १०० मानल्यास फेब्रुवारी, १९४४ मध्यें तो २३० झाला. जानेवारी, १९४४ मध्यें तो २३८ होता. म्हणजे, जानेवारी, १९४४ पेक्षा फेब्रुवारी १९४४ मध्यें महागाई किंचित् कमी होती.

### लागवडीच्या जमिनीचें नुकसान

व्हेसुव्हियसचा ज्वालामुखी प्रज्वलित झाल्याकारणानें दक्षिण इटलीमधील ५० हजार एकर जमीन चालू वर्षी निरुपयोगी झाली आहे व आणखी २ लक्ष एकर जमिनींचा पूर्णपणें उपयोग होणें अशक्य झालें आहे.

### अमेरिकेंत स्त्रियांची वाढती संख्या

अमेरिकेची लोकसंख्या १ जुलै, १९४२ रोजीं, परदेशीं गेलेले सैनिक वगळून, १३ कोटि, ४३ लक्ष भरली. १९४० सालीं ती १३ कोटि, २८ लक्ष होती. लोकसंख्या वाढत असली तरी तिच्यामधील पुरुषांचे प्रमाण घटत आहे. १९४० मध्यें स्त्रियांचेपेक्षा पुरुष ४½ लक्ष अधिक भरले, तर आतां पुरुषांपेक्षा स्त्रिया ६½ लक्ष ज़ास्त आहेत.

### इंग्लंडमधील "बचत करा" मोहीम

लहान-मोठ्या रकमांची बचत लोकांनीं करावी आणि त्या सरकारी रोख्यांत गुंतवाव्या ह्यासाठी इंग्लंडमध्यें जोराची मोहीम गेलीं चार वर्षे चालू असून तिला स्पृहणीय यशहि प्राप्त झालें आहे. अशा बचतीची रकम १९४० मध्यें १२५ कोटि पौंड होती, ती १९४१ मध्यें १७५ कोटि व १९४२ सालीं १६९ कोटि पौंड भरली. गेल्या वर्षी हा आकडा १९० कोटि पौंड झाला. वरील चार वर्षांत एकूण ६६१ कोटि पौंडांची बचत ब्रिटिश जनतेनें केली. रुपयांमध्यें ही एकूण रकम सुमारें ८,८२० कोटि रुपये होते.

### ब्रिटिश बँकांचा नफा

ब्रिटिश बँकांनीं भागीदारांस वाटलेलें डिव्हिडंड यंदां पूर्वीच्या वर्षाइतकेंच आहे. तथापि, त्यांस झालेल्या नफ्यांत थोडी वाढ झाली आहे. सर्वसाधारणपणानें कर देऊन शिलक राहिलेल्या नफ्यापैकी ६० टक्के डिव्हिडंडमध्यें त्यांनीं खर्च केला असून १६ टक्के रिझर्व्हस (मामुली आणि खास) मध्ये, ८ टक्के मालमत्ता व रिपेअर्ससाठी, सुमारें ६ टक्के युद्धपरिस्थिति रिझर्व्हसाठी, ७ टक्के पेन्शनांसाठी व २½ टक्के पुढील सालीं ओढण्यासाठी अशी त्याची वाटणी करण्यांत आली आहे. ह्या आकड्यांवरून ब्रिटिश बँकांच्या सावधगिरीच्या धोरणाची कल्पना येते.

### सोन्याच्या किंमतीमधील वाढीचा बँकांवर परिणाम

सोन्याच्या वाढत्या मागणीमुळें बँकांकडेहि पैशाची मागणी ज्यास्त आली, त्याचा परिणाम शेड्यूल्ड बँकांच्या रिझर्व्ह बँकेकडील ठेवींवर झाला; हें खालील तक्त्यावरून स्पष्ट होईल:—

| १९४४ | रिझर्व्ह बँकेकडील ठेवी (कोटि रु.) |
|---|---|
| जानेवारी पहिला आठवडा | ८८·७२ |
| फेब्रुवारी „ | ७५·३७ |
| मार्च „ | ५७·०८ |
| २४ मार्च | ५३·४२ |
| ३१ मार्च | ४९·९१ |

बँकांकडे सरकारी रोखे व सोनें ह्यांच्या तारणांवरील कर्जमागणींचे अर्ज पुष्कळ आले व बँकांची त्यांतील गुंतवणूक ह्यामुळें वाढली.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ११४ | ५ स्फुट विचार ... | ११७ |
| २ ब्रिटिश बँकांची परिस्थिति आणि भवितव्य ... | ११५ | कापसाचें धंद्यांत, नफेबाजी—गिरणीवाल्यांच्या तक्रारी—हिऱ्यांचा जागतिक व्यापार | |
| ३ वैद्यकीय उपचारांच्या सोयी ... | ११६ | ६ माल घेणाराची सोय पहा | ११८ |
| ४ उद्योगधंदे कोणते काढा ! | ११६ | ७ पुनः आखूड कपास ! | ११९ |



# अर्थ

बुधवार, ता. १२ एप्रिल १९४४


## ब्रिटिश बँकांची परिस्थिति आणि भवितव्य

(१)

इतर धंद्यांप्रमाणें बँकांच्या व्यवहारावर युद्धपरिस्थितीचें विशिष्ट परिणाम झाले आहेत आणि त्या संस्थांस स्वतःची व्यवस्था नवीन घडामोडींशीं जुळती करून घ्यावी लागली आहे. लोकांकडून येणाऱ्या वाढत्या ठेवी आणि सरकारी रोख्यांत अधिक गुंतवण हे बँकांच्या व्यवहारांत दिसून येणारे ठळक युद्धकालीन बदल असल्याचा अनुभव हिंदुस्थानांत येत आहे. ह्यासंबंधांत ब्रिटिश बँकांची स्थिति कोणत्या प्रकारची आहे ह्याची तुलनात्मक माहिती बोधप्रद झाल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या बँकांचे गेल्या डिसेंबर अखेरचे ताळेबंद प्रसिद्ध झाले आहेत आणि त्यांच्या अध्यक्षांनीं स्पष्टीकरणार्थ केलेली भाषणेंहि आतां उपलब्ध आहेत. आपल्या बँकांची सद्यःस्थिति कशी आहे आणि युद्धोत्तर काळांत त्यांचेपुढें कोणते प्रश्न उभे रहाणार आहेत ह्याची चर्चा ह्या अध्यक्षांनीं केलेली आहे आणि ती विचारप्रवर्तक आहे. ह्या देशांत बँकांचा विस्तार सध्या झपाट्यानें चालला आहे आणि त्यांनींहि युद्धोत्तर परिस्थितीस तोंड देण्याच्या प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार करणें आवश्यक आहे. युद्धसमाप्तीनंतर जागतिक व राष्ट्रीय आर्थिक स्थितीची घडी नीट बसण्याचे मार्ग इतर धंद्यांप्रमाणें बँकांसहि शोधले पाहिजेत. ब्रिटिश बँकिंगच्या नेत्यांनीं ह्या गोष्टीकडे लक्ष दिलें आहे आणि आपल्या उद्योगाचें स्थान टिकवण्यासाठी योजावयाच्या उपायांचें चिंतन ते करीत आहेत. लंडनमधील प्रमुख बँकांच्या ताळेबंदांतील व्यवहाराचे ठळक आकडे तुलनात्मक रीतीनें खाली दिले आहेत, त्यांवरून युद्धपरिस्थितीचा परिणाम त्यांचेवर कसा झाला आहे हें दिसून येईल:—

( आकडे दशलक्ष पौंडांचे आहेत )

| वर्ष अखेर | १९३८ | १९४० | १९४२ | १९४३ |
|---|---|---|---|---|
| ठेवी ... | २,२५४ | २,८०० | ३,६२९ | ४,०३२ |
| रोकड ... | २४३ | ३२४ | ३९० | ४२३ |
| वाटेवरील बाबी ... | ७१ | १३५ | १८६ | २०१ |
| अल्प मुदत कर्जें ... | १५९ | १५८ | १४२ | १५१ |
| हुंड्या ... | २५० | २६५ | १९३ | १३३ |
| ट्रेझरी रिसीट्स ... | ... | ३१४ | ८९६ | १,३०७ |
| त्वरित येणें ... | ७२३ | १,१९६ | १,८१२ | २,२१४ |
| " % ... | ३२% | ४२% | ४९.९% | ५४.९% |
| रोख्यांत गुंतवण ... | ६३१ | ७७१ | १,१२० | १,१५४ |
| कर्जें ... | ९६६ | ९०६ | ७७३ | ७४३ |

युद्धाचे प्रारंभापासून ब्रिटिश बँकांच्या व्यवहारास नवीन वळण लागलें तेंच ठळक रीतीनें गेल्या सालीं त्यांच्या ताळेबंदांत दृष्टीस येतें. बँकांकडील लोकांच्या ठेवी वाढून त्यांनीं १९४३ मध्यें उच्चांक गाठला आणि त्यांची रक्कम ४०३ कोटि पौंडांवर ( सुमारें साडेपाच हजार कोटि रुपये ) गेली. त्यांनीं दिलेल्या कर्जांत पुन्हां घट झाली आणि ट्रेझरी डिपॉझिट रिसिटसमधली रक्कम वाढली. तरत्या व तात्काळ हातीं येणाऱ्या पैशाचें प्रमाण पुष्कळच चढलें आहे. रोकड, हुंड्या, इत्यादींच्या येण्याचें ठेवींशी प्रमाण युद्धापूर्वी ३० टक्के असलें म्हणजे तें योग्य आहे असें म्हणण्याचा प्रघात होता. पण हें प्रमाण, विशेषतः ट्रेझरी डिपॉझिट रिसीटसमध्यें बँका गुंतवण करूं लागल्यानें, ५५ टक्क्यांपर्यंत चढलें आहे. बँकांच्या तरत्या पैशाच्या प्रमाणांत विलक्षण वाढ युद्धपरिस्थितींत झाली आहे हा त्याचा अर्थ आहे; आणि त्याच मानानें बँकांचा मुख्य व्यवहार कर्जें देण्याचा असतो, तो मर्यादित झाला आहे हें स्पष्ट आहे.

बँकिंगच्या व्यवहारांतली ही मंदी कशी दूर होईल आणि आपला पैसा पुन्हां व्यापाराच्या व उद्योगधंद्यांच्या मदतीसाठी कसा कर्जाऊ दिला जाईल ह्याकडे बँकर्सचें लक्ष लागलें आहे. लॉइड्स बँकेचे अध्यक्ष, लॉर्ड वॉर्डिंग्टन, ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें सध्या बँकांचे ताळेबंद ' इनव्हेस्टमेंट ट्रस्ट्स ' च्या म्हणजे रोख्यांत व कंपन्यांच्या भागांत पैसा गुंतवण्याचा धंदा करणाऱ्या मंडळांच्या ताळेबंदाप्रमाणे झाले आहेत. त्यांच्या मतें युद्धसमाप्तीनंतर आर्थिक पुनर्रचना हातीं घ्यावी लागेल आणि तिच्यासाठी भांडवलास मागणी उत्पन्न होईल ती कर्जांच्या मार्गानें भागवण्याची संधी बँकांस मिळेल. नवीं घरें बांधलीं जातील, रस्ते करण्यांत येतील आणि यंत्रसामुग्रीची पुनर्घटना होईल. येथें बँकांचा पैसा गुंतूं शकेल. हिंदुस्थानांत ह्या दिशेच्या संवर्धनास पुष्कळच वाव आहे हें खरें आहे. तथापि, दुसऱ्या बाजूस कांहीं बाबी आहेत, त्याहि हिशेबांत घेतल्या जाणें अगत्याचें आहे. व्यक्तींचा व कंपन्यांचा पैसा आज ठेवींमध्यें अडकला आहे तो युद्धसमाप्तीनंतर आर्थिक पुनर्रचनेंत घातला जाईल हें विसरतां कामा नये. सर्वांच्या ठेवी आज सरकारपाशीं ठेवण्यांत येत आहेत, त्या युद्धसमाप्तीनंतर मोकळ्या होतील आणि त्यांचा उपयोग करणें कंपन्यांस सोयीचें व फायद्याचें होईल. ह्या कारणानें ब्रिटिश बँकांनीं दिलेल्या कर्जांत फार मोठी वाढ होईल अशी अपेक्षा करणें सुरक्षित नाहीं, असें वाटण्यास जागा आहे. मात्र आर्थिक संवर्धनाची मोठी योजना हिंदुस्थानांत हातीं घेतली गेल्यास बँकांच्या साहाय्याची त्यांत आवश्यकता भासेल.

## वैद्यकीय उपचाराच्या सोयींची आवश्यकता

डायरेक्टर जनरल ऑफ मेडिकल सर्व्हिस, जनरल हॅन्स, ह्यांनीं आपल्या दिल्ली येथील एका भाषणांत, प्रत्येक देशाच्या सरकारनें आपल्या प्रजेच्या आरोग्याकरितां किमान कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत, ह्याची एक तपशीलवार यादी दिली. तिच्यावरून हिंदुस्थानांत ह्यासंबंधांत सरकारी प्रयत्न अद्याप किती मोठ्या प्रमाणावर होणें आवश्यक आहे, ह्याची कल्पना येईल. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें प्रत्येक नागरिकास खालील सोयी उपलब्ध पाहिजेत:—

(१) नेहमीं

(अ) पुरेसा व स्वच्छ पाण्याचा पुरवठा

(ब) पुरेसा स्वच्छतेचा मलपुरवठा

(क) आरोग्यदायक घर

(ड) ज्या रोगांचा प्रतिबंध होऊं शकेल अशांपासून संरक्षण.

(२) आजारी पडल्यावर—अचूक रोगनिदान व जरूर ती शुश्रूषा.

प्रत्येक स्त्रीला—

(अ) गर्भवती असतांना योग्य काळजी व सल्ला.

(ब) प्रसूतीचे वेळीं सहाय.

(क) बाळंतपणीं आईची व अर्भकाची तज्ज्ञांकरवीं काळजी.

प्रत्येक मुलास—

एकसारखी वैद्यकीय देखरेख व जरूर तेव्हां उपचार.

वरील ध्येय आपल्या आवाक्याबाहेरचें आहे, असा समज होण्याचा संभव आहे. परंतु रशियांतील २० वर्षांपूर्वीची परिस्थिति हिंदुस्थानच्या आजच्या परिस्थितीसारखीच असतांना त्यानें वरील गोष्टी साध्य केलेल्या आहेत. हिंदुस्थानांतील दळणवळणाचीं साधनें रशियांतील त्या वेळच्या साधनांपेक्षा चांगलीं आहेत, ही अनुकूल बाबहि येथें ध्यानांत बाळगली पाहिजे. डॉक्टर, परिचारिका, दाया, इस्पितळें, ह्या सर्वच बाबतींत हिंदुस्थानाची प्रगति अद्याप पुष्कळच व्हावयाची आहे.

---

### नवीन उद्योगधंदे कोणते काढा?

ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशननें सर विश्वेश्वरय्या ह्यांचे नेतृत्वाखालीं प्रत्येक प्रांतांत मूलग्राही उद्योगधंदे स्थापन होण्याविषयींच्या प्रचाराचें महत्त्वाचें कार्य चालविलें आहे. मोटारी, विमानें, आगबोटी, इंजनें, कारखान्यास लागणारी यंत्रसामुग्री, मशीन टूल्स, लोखंड व पोलाद, वीज, युद्धसाहित्य, ॲसिडें, क्लोरिन, सोडा ॲश, रंग, रेयॉन इत्यादींच्या उत्पादनाचे धंदे हे मूलग्राही उद्योगधंदे मानण्यांत आले आहेत, व त्यांच्या प्रगतीवर कोठल्याहि देशाची औद्योगिक भरभराट अवलंबून असते. ह्यासंबंधांत एक छोटेखानी पुस्तक ऑ. इं. मॅ. ऑर्गनायझेशननें प्रसिद्ध केलें आहे व त्यांत प्रत्येक प्रांतांतील विद्यमान मूलग्राही धंदे व योजिलेले धंदे ह्यांची माहिती दिली आहे. मुंबई प्रांतांत कपास कापडाच्या गिरण्या ह्याच अर्थानें आज महत्त्वाच्या आहेत. संबंध हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या गिरण्यांत गुंतलेल्या भांडवलाच्या ५०% पेक्षां अधिक भांडवल एकट्या मुंबई प्रांतांतील गिरण्यांत गुंतलेलें आहे.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. १०,००,००० | रु. ४,९६,१७० |

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमियमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

सी. व्ही जोग,
B. Com., C. A. I. B., C. A. I. I. B.
मॅनेजर

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील
## आदर्श निवासस्थान व भोजनालय
## छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

## मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध
# मागोरा पिल्स
अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.
१६ गोळ्यांच्या डबीस रु. १
— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —
मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

# स्फुट विचार

### कापडाचे धंद्यांत नफेबाजी

बाजारभावांचें नियंत्रण सरकारनें केलें तरी तें प्रभावी होत नाहीं आणि त्याच्या अंमलबजावणींत धंदेवाल्यांस पळवाटा सापडतात तोंपर्यंत गिऱ्हाइकांस सरकारी धोरणाचा पुरेसा फायदा मिळत नाहीं आणि महागाईचा जाचकपणा शिल्लक रहातो. कापड व्यापाऱ्यांनीं माल विक्रीस काढला पाहिजे आणि त्यावर छापलेल्या किंमतीस तो विकला पाहिजे असा निर्बंध सरकारनें घातल्यामुळें किंमती थोड्या उतरल्या. तथापि, नियंत्रणाच्या कचाटींतून कांहीं धंदेवाले निसटत असल्याचें दिसून आलें असून त्यांचे विरुद्ध उपाययोजना करण्याची आवश्यकता भासली आहे. कापड नियंत्रण समितीची बैठक गेल्या आठवड्यांत मुंबई येथें भरली होती, त्यावेळीं ह्या प्रश्नाचा विचार झाला आणि टेक्सटाईल कमिशनरला नियंत्रणाच्या कडक अंमलबजावणीचे कामीं सहाय देण्याचें ठरलें. समितीचे अध्यक्ष, श्री. कृष्णराज ह्यांनीं गिरण्यांचें, त्यांनीं अलीकडे कापडाच्या किंमती आणखी उतरवल्याबद्दल अभिनंदन केलें आणि त्यांचेवर होणाऱ्या प्रतिकूल टीकेचा अन्यायीपणा निदर्शनास आणला. कापडाचें नियंत्रण मुळांतच बेतानें यशस्वी होत असतां तेंहि निष्फळ करणाऱ्या कांहीं गिरण्या व व्यापारी ह्यांचा त्यांनीं निषेध केला आणि ह्या बाबतींत कडक उपाय तात्काळ न योजले गेल्यास नियंत्रणाचा सर्वच ग्रंथ आटपणार आहे असें स्पष्ट सांगितलें. सामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीनें हा प्रश्न अत्यंत महत्वाचा व तातडीचा आहे. गिरणीवाल्यांच्या प्रमुख प्रतिनिधीनेंच कापडाच्या बाजारांत चाललेल्या गर्ह्य नफेबाजीचें आविष्करण करून तिच्याविरुद्ध कडक उपाययोजनेचें अगत्य प्रतिपादिलें ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. कापड, गिरण्या व मोठे बाजार ह्यांतून लहान गांवांत जाऊन पोहोचण्याचे मार्गांत वहातुकीच्या अडचणी येत आहेत त्यांचेकडे श्री. कृष्णराज ह्यांनीं हिंदुस्थान सरकारचें लक्ष वेधलें आणि दगडी कोळशाच्या तोकड्या पुरवठ्याचा कापडाच्या उत्पादनावर होत असलेल्या अनिष्ट परिणामाचाहि उल्लेख केला.

### गिरणीवाल्यांच्या तक्रारी

कापड व सूत ह्यांच्या बाजारांतील नफेबाजीचें जें कृष्णचित्र श्री. कृष्णराज ह्यांनीं रंगविलें आहे त्यायोगानें गिरणी मालक व चालक व्यापारी ह्यांचेविषयीं महागाईनें गांजलेल्या जनतेस सहानुभूति वाटणें कठिण आहे. कृष्णकारवाया करणारे धंदेवाले अल्पसंख्याक असले तरी त्यांचे योगानें कापडाच्या सबंद धंद्यास बट्टा लागण्याची भीति आहे हें विसरतां कामा नये. टेक्सटाईल कमिशनरनीं पांच सहा गिरण्या व चाळीस चालक व्यापारी ह्यांचे विरुद्ध उपाय योजले आहेत आणि ह्या प्रकरणीं त्यांस अधिक अधिकार देण्यांत आले आहेत. त्यांस पाठिंबा देण्याचें गिरणीवाल्यांच्या प्रतिनिधींनीं अभिवचन दिलें आहे ह्यामुळें कापडनियंत्रण अधिक कडक व फलद्रूप होण्याची आशा उत्पन्न होत आहे. छिटाचें कापडनियंत्रण योजनेंतून वगळलें गेलें आहे ह्या गोष्टीचा अवास्तव फायदा कित्येक धंदेवाले घेत आहेत त्यांचा बंदोबस्त सरकारनें करावा असें सुचवण्यांत आलें आहे. वहातुकीच्या सोयी करून देऊन देशाच्या सर्व भागांत कापडाची वाटणी व्यवस्थित रीतीनें होईल अशी तजवीज सरकारनें करणें ही सूचना योग्य आहे. डोंगराळ व अडचणीच्या प्रदेशांत कापड विकणारांस सूट राहील ह्या बेतानें मालाच्या किंमती ठरवल्या जाव्या हेंहि सरळ आहे. स्थानिक जकाती, मालविक्रीवरील कर इत्यादींमुळें धंदेवाल्यांस मिळणारा नफा वाजवीपेक्षा अधिक मर्यादित होतो ही तक्रार विचार करण्यासारखी आहे. जादा नफ्याच्या सध्याच्या योजनेमुळें गिरण्यांस युद्धापूर्वीच्या काळाचे मानानें निम्मा नफा सुटत नाहीं आणि ह्यायोगानें त्यांस उत्पादनाचे बाबतींत उत्साह वाटत नाहीं ह्या गोष्टीकडे श्री. कृष्णराज ह्यांनीं हिंदुस्थान सरकारच्या फडनविसांचें लक्ष वेधलें आहे. गिरण्यांच्या धंद्यास यंत्रसामुग्रीच्या दुरुस्तीसाठी वगैरे पैशाचा पुरवठा करण्याची सवड ठेवण्यांत आली नसल्यानें त्यावर विलक्षण ताण पडत असून त्यांचें भवितव्य धोक्यांत येण्याचा संभव आहे, ह्यासाठी फडनविसांनीं आपल्या करविषयक धोरणाचा फेरविचार करावा असें त्यांनीं म्हटलें आहे. आतांपर्यंत गिरण्यांनीं मिळवलेल्या नफ्यांकडे आणि सर्व जनतेवर पडणाऱ्या आर्थिक बोजाकडे पाहिलें असतां ही ओरड किती सार्थ आहे ह्याचा विचार करावा लागेल.

### हिऱ्यांचा जागतिक व्यापार

दागिन्यांत हिऱ्यांचा उपयोग होतो, तसा तो उद्योगधंद्यांतहि होतो. युद्धकाळांतहि सोनें-चांदीस मोठी मागणी असून ह्या धातूंची किंमत वाढलेली आहे, तेव्हां हिऱ्यांचा व्यापार आणि उपयोग युद्धाच्या कठिण परिस्थितींत बंद पडला नसल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. १९४३ सालांत हिऱ्यांच्या व्यापाराची उलाढाल २० ते २५ कोटि रुपयांपर्यंत सबंद जगांत झाली असल्याचा अंदाज आहे. १९३८ मध्यें हा आकडा फक्त ५ कोटींचा आणि १९४२ सालीं १३ कोटींचा होता. हिऱ्यांचें जागतिक उत्खनन १९४० मध्यें १ कोटि ३० लक्ष मेट्रिक कॅरॅटस होतें तें १९४२ सालीं ९२ लक्ष कॅरॅटसपर्यंत खालीं आलें आणि गेल्या वर्षी तें सुमारें १ कोटि कॅरॅट्स झालें असावें असा अजमास आहे. हें जागतिक उत्पादन प्रामुख्यानें पश्चिम आणि दक्षिण आफ्रिकेंत होतें व चालू सालीं त्यांत विस्तार होण्याचा रंग आहे. हिऱ्यांच्या जागतिक उत्पादनाची १९४२ सालीं सुमारें ९ कोटि रुपये इतकी किंमत भरली आणि १९४३ बाबतचा तत्सम आकडा ह्याहून मोठा असण्याचा संभव नाहीं. हिऱ्यांच्या जागतिक खपांत गेल्या दोन वर्षांत बरीच घट झाली आहे, तथापि त्यांच्या व्यापारास धोका येण्याचा संभव नाहीं. बाजारासाठी पक्के हिरे तयार करण्याचा धंदा युद्धापूर्वी मुख्यतेंकरून ॲम्स्टरडॅम व ॲंटवर्प येथें चालत असे, तो युद्धपरिस्थितीमुळें इंग्लंड, अमेरिका, पॅलेस्टाइन व दक्षिण आफ्रिका ह्या देशांत विभागला गेला असून युद्धोत्तर काळांत तो आपल्या हातीं ठेवण्याचा ह्या देशांचा प्रयत्न आहे. तथापि, हॉलंड व बेल्जम ह्यांचें हिऱ्यांच्या धंद्यांतलें स्थान पूर्ववत् प्रस्थापित व्हावें अशीहि खटपट चालली आहे. बेल्जम काँगोमध्यें हिऱ्यांचें उत्खनन फार मोठ्या प्रमाणांत होत असल्यानें बेल्जमचें प्राबल्य नाहींसें होणें अशक्य आहे.

### माल घेणाराची सोय पहा

हूंबरेड मेन कंपनी लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर मि. हॅपसन ह्यांनी एका स्पॅनिश व्यापाऱ्यास "तूं ब्रिटिश मालाचा व्यापार कां करीत नाहींस?" असें विचारलें. त्यावर तो म्हणाला, "तुम्ही विकण्यास उत्सुक दिसत नाहीं. प्रत्येक यार्डास ७½ पेन्स, अथवा प्रत्येक हंड्रेडवेटला ११३ शिलिंग वजा २५% अधिक १०% वजा २%, एफ्. ओ. बी. लिव्हरपूर, रेल्वे व शिपिंगच्या पावत्या रोखीनें सोडवून घेणें, अशा किचकट प्रकारचा तुमचा व्यवहार असतो. तुमचा जर्मन प्रतिस्पर्धी मला पिसेटोजमध्यें (स्पेनचें नाणें) व किलोग्रॅममध्यें (स्पेनमधील वजन) किंमत सांगतो; रेल्वे व शिपिंगचें भाडें, विमा, आयात जकात, इत्यादि सर्व भरून घर-पोंच माल तो आणून देतो. शिवाय ६० दिवसांच्या हुंडीच्या आधारावर तो मला पैसे भरण्याची सवड देतो. तुमच्या मालाचा दर्जा जास्त-चांगला असतो, हें मला मान्य आहे. कदाचित तुमचा माल स्वस्तहि पण असेल. परंतु, ७½ पेन्स म्हणजे मी काय समजूं? एक यार्ड म्हणजे किती मीटर व हंड्रेडवेटांत किती किलोग्रॅम असतात, ह्याचा हिशेब प्रत्येक वेळेस कोण करणार? लिव्हरपूलपासून ह्या बंदरापर्यंतच्या भाड्याचा आकार पिसेटाजमध्यें किती होतो? माल मिळण्यापूर्वी त्याची किंमत मी देऊं शकतों, परंतु ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं मला ६० दिवसांची उधारी दिली, तर बँकेचें डिस्कौंट व इतर चार्जेस भरूनहि मी दुप्पट धंदा करूं शकेन." परदेशी व्यापाऱ्यांच्या अडचणींचें ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं काळजीपूर्वक निरीक्षण केलें पाहिजे, हें सांगतांना मि. हॅपसन ह्यांनीं वरील उदाहरण दिलें. "ही माझी किंमत; वाटेल तर घे नाहीं तर नको" ह्या पद्धतीनें ह्यापुढें व्यापार चालणार नाहीं. आतांपर्यंत निर्यात व्यापारावर ब्रिटिशांची भरभराट झाली, परंतु विक्रीच्या तंत्रांत सुधारणा घडवून आणणें अधिकाधिक आवश्यक होत आहे त्याकडे ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं लक्ष द्यावें, अशी त्यांची सूचना आहे.

---

### श्री. गोसले स्टॉक एक्सचेंजचे सभासद झाले

महाराष्ट्र बँकेचे पूर्व व्यवस्थापक श्री. म. वि. गोसले ह्यांना मुंबईच्या स्टॉक एक्सचेंजनें सभासद म्हणून निवडलें आहे. स्टॉक एक्सचेंजच्या सुमारें ४०० सभासदांपैकीं महाराष्ट्रीय सभासदांची संख्या दहा-बारा सुद्धां नाहीं व त्यांत श्री. गोसले ह्यांची भर पडली आहे. त्यांची कचेरी २१, दलाल स्ट्रीट, कोट, मुंबई, येथें आहे.

---

### कलकत्ता शहरांतील कोळशाचा तुटवडा

कलकत्ता शहरांतील कोळशाच्या तुटवड्याची कारणमीमांसा बंगाल विधिमंडळांत नुकतीच करण्यांत आली, त्या वेळीं मंत्रि मि. सुऱ्हावर्दी म्हणाले, "गेल्यावर्षी दरमहा ३,६०० वाघिणी मिळत असत. गेल्या नोव्हेंबरपासून त्यांची संख्या २,००० करण्यांत आली. मार्च १९४४ मध्यें ती १९५२ करण्यांत आली; त्यापैकीं फक्त ९६० वाघिणी कलकत्त्याच्या वाट्यास येत. जानेवारीपासून दरमहा ९०० पेक्षा कमी वाघिणी कोळसा येऊं लागला; जानेवारींत ६११ व फेब्रुवारींत ५२८ वाघिणी कोळसा आला. मूळ योजनेप्रमाणें वाघिणी येत नाहींत, त्यास बंगाल सरकार जबाबदार नाहीं."


## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. ह. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वमान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महाराष्ट्राची पहिली शेड्यूल्ड बँक

## न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

( हेड ऑफिस : मुंबई )

अधिकृत भांडवल : ३०,००,००० रु.
रोख जमा झालेलें भांडवल : ६,००,००० रु.

**एकूण खेळतें भांडवल : ९५,००,००० रु.**

—: शाखा :—

सोलापूर, नाशिक, नाशिक रोड, देवळाली, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, मिरज, महाड, लोणंद, अहमदनगर, पुणें, धुळें, जळगांव, दिल्ली, अमरावती, मालेगांव, सिन्नर, संगमनेर.

D. N. Gandekar, B. A., LL. B. पुणें ब्रँच मॅनेजर
D. D. Deshpande, B. A., मॅनेजिंग डायरेक्टर

रक्तवर्धक प्रमाणेंच लोकप्रिय

## दोन उपयुक्त औषधें.

**ओजस** पौष्टिक पेयान्न
आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस उपयुक्त

मुलांचे करितां **अँटी ग्राइप मिक्श्चर**
दांत सुलभतेनें येण्यावर व मुलांचे अपचनाचे विकारावर

केंद्रें—मुंबई, पुणें, नागपूर, उमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
पुणें मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड पुणें.

## आयुर्वेद रसशाळा

पुणें लि० पुणें ४.

## पुनः आखूड धाग्याच्या कपाशीची लागवड !

आखूड धाग्याच्या कपाशीऐवजीं लांब धाग्याच्या कपाशीचें उत्पादन हिंदुस्थानांत कसें वाढत आहे. व दर एकरी उत्पादनांतहि हळुहळु कशी सुधारणा होत आहे ह्याची माहिती इंडियन सेंट्रल कॉटन कमिटी, मुंबईचे सेक्रेटरी श्री. मेहता ह्यांनीं एकत्रित करून त्याचा निबंध लंडनच्या रॉयल सोसायटी ऑफ आर्टसकडे पाठविला, तो त्या सोसायटीच्या सभेंत त्यांचेतर्फे सर फ्रँक नॉइस ह्यांनीं वाचून दाखविला. श्री. मेहता ह्यांनीं दिलेल्या माहितीस सर फ्रँक नॉइस ह्यांनीं आपल्या नंतरच्या भाषणांत पुस्ती जोडून इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीच्या कार्याचें त्यांनीं सविस्तर वर्णन केलें. हिंदी कपाशीचें उत्पादन व त्याचा गिरण्यांतील उठाव हीं चित्ररूपानें त्यांनीं पडद्यावर दाखविलीं. मि. रूडॉल्फ ॲन्स्टेड ह्यांनीं हिंदी आंखूड धाग्याच्या कपाशीच्या युद्धोत्तर परिस्थितीसंबंधीं काढलेले उद्‌गार महत्त्वाचे आहेत. "अमेरिका व युरोप येथील लोकांच्या कपड्यांत फारच मोठा बदल घडून येण्याचा संभव दिसतो. कपाशीची जागा कृत्रिम रेशीम घेईल, इतकेंच नव्हे तर रेयॉनप्रमाणें नेयॉनहि येईल. कृत्रिम रेशमाच्या बनावटीस सेल्युलोज लागतें, त्याकरितां आंखूड धाग्याची कपास मोठ्या प्रमाणावर उपयोगांत येईल. असें झालें, तर हिंदुस्थानांत पुनः आंखूड धाग्याच्या कपाशीस उत्तेजन देण्याचा प्रसंग येईल, कारण तिची लागवड सोपी आहे व कृत्रिम रेशमाचे संबंधांत धाग्याची लांबी महत्त्वाची नाहीं. कॉटन कमिटीला हा प्रश्न आणखी २५ वर्षें पुरेल."

### लांब धाग्याच्या कपाशीस उत्तेजन

सुमारें २० वर्षांपूर्वी १ इंच व त्यापेक्षां जास्त लांब धाग्याच्या कपाशीचें हिंदुस्थानांत उत्पादन जवळ जवळ नव्हतेंच, असें म्हटलें तरी चालेल. १९४१–४२ मध्यें तें उत्पादन ४,१५००० गाठी भरलें. १९४२–४३ मधील उत्पादनाचा आकडा ५,००,००० गाठींचे आसपास आहे. आंखूड धाग्याच्या (⅞" व त्यापेक्षां कमी लांबीच्या) कपाशीच्या उत्पादनाचा १९२३–२९ मधील वार्षिक सरासरीचा आकडा ३७,०१,००० गांठी होता; १९४१ ४२ मध्यें तो २४,५८,००० झाला व १९४२–४३ मध्यें तो १२,५५;००० गांठींवर आला. म्हणजे, एकूण उत्पादनाशीं आंखूड धाग्याच्या कपाशीच्या उत्पादनाचें प्रमाण ६४% वरून ४१% व त्यावरून २८% वर आलें आहे.

चालू युद्धानें लांब धाग्याच्या कपाशीच्या उत्पादनास एकदम उत्तेजन दिलें. युरोपकडे दरसाल हिंदुस्थानांतून ८३ लक्ष गाठी कपास जाते, ती बंद झाली. १९४०–४१ मध्यें हिंदी गिरण्यांनीं नेहमीपेक्षां ६ लक्ष गांठींचा जास्त उठाव केला, त्यामुळें निर्गत थांबल्याचा दुष्परिणाम बराच कमी झाला. जपाननें युद्धांत प्रवेश केल्यानंतर मात्र, दरसाल १५ लक्ष गांठींचा उठाव करणारी बाजारपेठ हिंदुस्थानास बंद झाली व हिंदुस्थानांतील कपाशीची–विशेषतः आंखूड धाग्याच्या कपाशीची-लागवड कमी करण्याची मोहीम सुरू करण्यांत आली. "अधिक धान्य पिकवा"ची मोहीम, आंखूड धाग्याच्या कपाशीच्या स्थलांतरावर मुंबई सरकारनें घातलेले निर्बंध, जरिला ( ¾ ) कपाशीस "कॉटन कॉन्ट्रॅक्ट"चे बाजारीं मिळालेलें स्थान, ह्या सर्वांचा कपाशीची लागवड नियंत्रित होण्यावर परिणाम झाला व जरिला कपाशीची लागवड मध्य प्रांत, वऱ्हाड व खानदेश प्रांत विशेषेंकरून वाढली.

### दर एकरीं उत्पादन

कपाशीच्या एकूण उत्पादनाप्रमाणें तिचें दर एकरी उत्पादनहि वाढत आलेलें आहे. १९२२ ते १९२७ ह्या पांच वर्षांचे मुदतीचे मानानें १९३० ते १९४२ ह्या मुदतींत दर एकरीं उत्पादन ९६ पौंडांवरून ११० पौंडावर गेले आहे. म्हणजे दर एकरीं उत्पादन १५% वाढलें आहे. सिंध व पंजाब येथें पाटाचे पाण्यावर कपास लावली जाते, त्याचा हा कांहीं अंशीं परिणाम असला, तरी उत्पादन वाढण्याचीं प्रमुख कारणें बियांत सुधारणा, खतांत सुधारणा व पिकांची अदलून बदलून लागवड हीं आहेत. अर्थात्, इतर देशांचे मानानें हिंदी दर एकरीं उत्पादन वाढण्यास अद्याप किती तरी वाव आहे !

१९२३–१९२८ ह्या पांच वर्षांचे मुदतींत हिंदी गिरण्यांनीं १९,६२,००० गांठी हिंदी कपास उठवली म्हणजे, एकूण हिंदी उत्पादनाच्या ३५% कपास त्यांनीं घेतली. ह्याच मुदतींत हिंदी गिरण्यांचा २०° खालील उत्पादनाचा आंकडा ११ कोटि पौंड म्हणजे एकूण उत्पादनाच्या ४५% होता. हिंदी गिरण्यांचें उत्पादन हळुहळु वाढत जाऊन १९३९ सालीं त्यांनीं ३१,५१,००० गाठी हिंदी कपास घेतली, त्यापैकीं २३% आंखूड धाग्याची होती. १९४१–४२ सालीं हेच आकडे अनुक्रमें ४०,२५,००० गांठी व २४% असे झाले. १९४३–४४ चे आकडे ह्याहिपेक्षा समाधानकारक आढळतील. युद्धामुळें हिंदी कपाशीची बाजारपेठ नाहींशी झाल्यामुळें १९३९–४० मधील निर्गतीचा आंकडा २३,४०,००० गाठी होता तो १९४१–४२ मध्यें ८,७५,००० गाठींवर आला.

### सेंट्रल कॉटन कमिटी

हिंदी कपाशीचा दर्जा वाढवून चांगल्या कपाशीच्या उत्पादनास प्रोत्साहन देण्यास इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीचें कार्य हेंच मुख्यतः कारणीभूत झालेलें आहे. हिंदुस्थानांत लांब धाग्याच्या कपाशीचें उत्पादन वाढविण्याची तीव्र आवश्यकता गेल्या महायुद्धानें पटवून दिली व १९१७–१८ च्या इंडियन कॉटन कमिटीच्या रिपोर्टाचा इंडियन सेंट्रल कॉटन कमिटी हा दृश्य परिणाम आहे. ह्या कमिटीच्या खर्चाची, हिंदी गिरण्यांत खपणाऱ्या किंवा निर्गत होणाऱ्या कपाशीच्या दर गांठीवर दोन आणे पट्टी बसवून व्यवस्था करण्यांत आली आहे. ह्या उत्पन्नांतून कमिटी दरसाल १० लक्ष रुपये संशोधन व सुधारणा ह्यांवर खर्च करूं शकते. कमिटीजवळ आतां सुमारें १३३ लाखांचा रिझर्व्ह फंड शिल्लक आहे. इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीचें कार्य बादशाही शेतकी कमिशनला पसंत पडून त्याच धर्तीवर इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चची स्थापना करण्याविषयीं कमिशननें सुचविलें. ताग साठीहि त्याच धर्तीवर कमिटीची योजना केलेली आहे. कपाशीच्या उत्पादक देशांत हिंदुस्थानाचा दुसरा अनुक्रम लागतो. जागतिक उत्पादनापैकीं ४८% उत्पादन अमेरिकेंत व १८% उत्पादन हिंदुस्थानांत होतें. लागवडीचें क्षेत्र व उत्पादन ह्यांची तुलना करतां, हिंदुस्थानांतील परिस्थिति असमाधानकारक आहे व ती सुधारणें हें सेंट्रल कॉटन कमिटीचें एक महत्त्वाचें कार्य आहे.

प्रगतिपथावरील नवा

# मैलाचा — दगड

सन १९४२ अखेर

नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

## दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं ( Vitamin's ) युक्त असे
( सरकार खात्यानें मान्यता दिलेले )

## टोमॅटो केचप ( गोड ) व टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

## रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें

बिझिनेस ऑफिसः १११ अ सदाशिव, पुणें २.

# ★ नगर बॉम्बे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॅब्लेट्स, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखाः— माणिक चौक, अहमदनगर
हेड ऑफिसः— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

# न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

## महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.